पुणे शहर पोलीस

# दर्पण

सप्टेंबर २०१९

# अभिप्राय...

'दर्पण' पुस्तकाबाबत -

मी पोना ६८३२ कुमार, नेमणूक हवेली पो.स्टे.

सध्या मी हवेली पो.स्टे. येथे डी.बी./ग्रामीण अंमलदार म्हणून कर्तव्य बजावीत आहे. पुण्याचे पोलीस आयुक्त श्री. डॉ. के. वेंकटेशम सर यांनी पोलीस दलाची जनमानसात प्रतिमा उंचावण्यासाठी 'दर्पण' पुस्तकाची संकल्पना सुरू केली आहे. या दर्पण पुस्तकामध्ये पोलीस अधिकारी/व कर्मचारी यांनी केलेल्या चांगल्या कामाचा गौरव करीत वर्तमान छापला गेला त्यामुळे सामाजिक लोकांना पोलीस सुद्धा चांगले काम करतो आहे याची जाणीव होवू लागली आहे. त्यामुळे पोलिसांची प्रतिमा चांगली होण्यास मदत झाली आहे. दर्पण पुस्तकामध्ये पोलिसांचे कामाचा चांगल्या कामाचा गौरव केला जातो हे पाहून इतर पोलीस बांधव हे सुद्धा चांगले काम करण्याची इच्छा बाळगून चांगले काम करते वेळेस याचे प्रमाण वाढत.

'दर्पण' पुस्तक खरोखरच पोलीस अधिकारी व कर्मचारी यांच्या गौरवाचेच पुस्तक आहे असे मला वाटते.

पोना ६८३२ कुमार [illegible]
हवेली पो.स्टे. पुणे

## गुडवर्क व दर्पण या पुस्तका बाबत अभिप्राय

पोलीस अधिकारी व कर्मचारी यांनी केलेल्या चांगल्या कामास (Good Work) वर्तमान पत्रात प्रसिध्दी देण्याचा व वर्तमान पत्रात प्रसिध्द झालेल्या कात्रणांपासून तयार केलेले दर्पण हे पुस्तक नागरिकांना पाहणेसाठी पोलीस स्टेशन स्तरावर उपलब्ध करून देण्यात आलेले आहे. हा उपक्रम हा अत्यंत चांगला आहे.

या उपक्रमामुळे पोलीस अधिकारी व कर्मचारी हे दैनंदिन कर्तव्या दरम्यान स्वयंस्फुर्तीने चांगले काम करण्यासाठी प्रयत्न करीत असल्याचे दिसून येत आहे. तसेच अशा केलेल्या चांगल्या कामाची माहिती ही पोलीस अधिकारी व कर्मचारी यांचे व्हॉटस्‌ॲप ग्रुप्सवर प्रसिध्द होत असल्याने त्याबाबत इतर अधिकारी व कर्मचाऱ्यांकडून शुभेच्छा देण्यात येतात त्यामुळे चांगले काम केलेल्या कर्मचाऱ्यांमध्ये आत्मविश्वास निर्माण होतो तसेच इतरांना चांगले काम करण्याची व त्यास प्रसिध्दी देण्याची ईर्शा निर्माण होते.

तसेच दर्पण हे पुस्तक येरवडा पोलीस स्टेशन येथे येणारे नागरिक वाचतात व पोलीसांचे चांगले कामाबद्दल चर्चा करतात. तसेच पोलीसांचे कामाबद्दल लोकांमध्ये विश्वास निर्माण होत आहे. वर्तमान पत्रातील चांगल्या कामाचे प्रसिध्दी मुळे नागरिक समक्ष भेटून अभिनंदन व शुभेच्छा देतात. त्यामुळे एकप्रकारे चांगला अनुभव मिळतो व त्यातून अधिक चांगले काम करण्यासाठी प्रेरणा मिळत आहे. सदरचे उपक्रम हे अत्यंत चांगले असून ते यापुढेही कायमस्वरूपी चालू ठेवावेत.

( शुभांगी मगदुम )
महिला पोलीस उप निरीक्षक
येरवडा पोलीस स्टेशन, पुणे

# लोकाभिमुख उपक्रम

लोकाभिमुख उपक्रम

**लोकमत** – दि. ६ सप्टेंबर, २०१९

## पोलीस आयुक्त डॉ. के. व्यंकटेशम : पोलिसांनी केला शिक्षकांचा सन्मान

# बुद्धिवादाची जोपासना करा

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे :** शाळेत आपण शास्त्र, इतिहास, गणित शिकतो, त्याचबरोबर आपल्या बुद्धीनुसार यश मिळवितो. काही जण अव्वल नंबरमध्ये येतात. पण बुद्धिवाद सदैव जागृत ठेवणे आवश्यक आहे. जन्मापासून मरणापर्यंत बुद्धिवादाची जोपासना करण्यावरच आपला विकास अवलंबून आहे. त्यामुळे तुम्ही सर्व मुलांनी बुद्धिवादाची जोपासना करणे गरजेचे आहे, असे मत पोलीस आयुक्त डॉ. के. व्यंकटेशम यांनी व्यक्त केले.

शिक्षक दिनाचे औचित्य साधून पुणे पोलीस आयुक्तालयातील पोलीस आयुक्त ते पोलीस कॉन्स्टेबल या सर्व स्तरावरील पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांनी आपल्या भागातील शाळेत जाऊन शिक्षकांशी संवाद साधत गुरुजनांचे शुभाशीर्वाद घेतले. शहरातील ८३५ शाळांना भेट देऊन सुमारे ११०० ते १२०० शिक्षकांना शुभेच्छा पत्र देऊन शिक्षकांप्रती कृतज्ञता व्यक्त केली.

अपर पोलीस आयुक्त सुनील फुलारी यांनी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. नितीन करमळकर यांची भेट घेऊन त्यांना शुभेच्छा दिल्या. तसेच शिक्षणमहर्षी डॉ. शां. ब. मुजुमदार, ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. रघुनाथ माशेलकर यांच्या कार्याप्रति कृतज्ञता व्यक्त करुन त्यांना शुभेच्छा दिल्या. पोलिसांनी पुढाकार घेऊन अशा प्रकारे शिक्षकांना शुभेच्छा देण्याचा नवीन उपक्रम राबविणे, चांगली बाब असल्याचे डॉ. माशेलकर यांनी सांगितले.

भवानी पेठेतील रफी अहमद किडवाई उर्दू माध्यमिक विद्यालयात व श्रीमती सावित्रीबाई फुले प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालयात पोलीस आयुक्त डॉ. के. व्यंकटेशम, अपर पोलीस आयुक्त अशोक मोराळे यांनी भेट देऊन शिक्षकांना शुभेच्छा दिल्या व विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. यावेळी पोलीस उपायुक्त स्वप्ना गोरे, महानगर पालिकेचे शिक्षणाधिकारी दीपक माळी, पोलीस निरीक्षक क्रांती पवार यांच्यासह पोलीस अधिकारी, शिक्षक उपस्थित होते. शहरातील सर्व शाळांमध्ये पोलीस कॉन्स्टेबल ते वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष भेट देऊन शिक्षकांविषयी आपल्या भावना व्यक्त करुन त्यांना शुभेच्छा दिल्या.



ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ डॉ. शां. ब. मुजुमदार, ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. रघुनाथ माशेलकर यांना शुभेच्छा देताना अपर पोलीस आयुक्त सुनील फुलारी, वरिष्ठ पोलीस निरीक्षक अनिल शेवाळे.



शिक्षक दिनानिमित्त भवानी पेठेतील रफी अहमद किडवाई उर्दु शाळेत पोलीस आयुक्त डॉ. के. व्यंकटेशम, अपर पोलीस आयुक्त अशोक मोराळे यांनी शिक्षकांना शुभेच्छा देऊन विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

> शिक्षक दिनानिमित्ताने पोलिसांनी येऊन शुभेच्छा देणे, हा माझा पहिलाच अनुभव आहे. पोलिसांचा उपक्रम नवीन आणि आनंददायक आहे.
>
> – डॉ. नितीन करमळकर, कुलगुरु, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

> पोलिसांनी आम्हाला शोधून प्रत्यक्ष भेट घेऊन आमच्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करणे व शुभेच्छा देणे यातच सर्व काही आले. खूप आनंद झाला.
>
> – डॉ. शां. ब. मुजुमदार

# At junctions of Smart City, an 'intelligent' system to help manage Pune's many traffic problems

EXPRESS NEWS SERVICE
PUNE, SEPTEMBER 17

IN A joint initiative by the Pune Municipal Corporation (PMC) and Pune Smart City Development Corporation Ltd (PSCDCL), various elements of the Intelligent Traffic Management System (ITMS) will be installed at the traffic junctions in the city to deal with traffic woes, said Pune Police Commissioner K Venkatesham on Tuesday.

Venkatesham was speaking on the sidelines of the ceremony held to hand over 80 gadget-equipped motorcycles from the PSCDCL to the traffic police on Tuesday. These Bajaj Pulsar bikes are equipped with a tracker and communication system, loud speaker and siren, a waterproof camera, a slot for cell phones and slots to carry three vehicle-immobilising jammers.

"Traffic issues are always given priority and as part of our continuous efforts, we will soon have the ITMS system which will help resolve many issues. There is also a proposal to set up a 'smart police' station and create 'cop-free' traffic junctions in coming days," said the police commissioner.

PSCDCL Chief Executive Officer Rajendra Jagtap said, "When we had sought suggestions from local residents about likely improvements in the city, the largest number of suggestions came on traffic issues, and we believe that modern technology will be able to solve these issues."



80 'Smart Police' motorcycles with cameras, jammers and other latest gadgets were distributed by Pune Smart City Development Corporation to the Pune traffic branch, in the presence of Police Commissioner K Venkatesham, Mayor Mukta Tilak and PSCDCL CEO Rajendra Jagtap at the Pune Police Commissionorate on Tuesday. *Arul Horizon*

The ITMS system, which has already been implemented in Mumbai, uses state-of-the-art monitoring equipment and Artificial Intelligence programmes to help police find more efficient ways of managing traffic.

Deputy Commissioner of Police, Traffic, Pankaj Deshmukh said, "The new bikes will help traffic police reach places much faster. Video and images transmitted to the control room will help analyse the problem and resolve it quickly."

### पारंपरिक पद्धतीने होणार सुरुवात : ९ हजार पोलिसांचा बंदोबस्त

# विसर्जन मिरवणुकीवर ड्रोन, सीसीटीव्हींचा 'वॉच'

लोकमत न्यूज नेटवर्क

पुणे : संपूर्ण जगभरातील भाविकांचे आकर्षण असलेल्या पुण्यातील वैभवशाली विसर्जन मिरवणुकीच्या प्रमुख मार्गावर लावण्यात आलेले सीसीटीव्ही तसेच ड्रोनच्या साहाय्याने वॉच ठेवण्यात येणार असून, सुमारे ९ हजारांहून अधिक पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांचा बंदोबस्त नेमण्यात आला आहे. दरवर्षीप्रमाणे पारंपरिक पद्धतीने विसर्जन मिरवणुकीत सुरुवातीला मानाची गणपती मंडळे सहभागी होणार असून, त्यात कोणताही बदल करण्यात आला नसल्याचे पोलीस आयुक्त डॉ. के.

काही मंडळांनी लक्ष्मी रोडवरून आम्हाला सकाळी ७ वाजता मिरवणूक काढण्यास परवानगी द्यावी, अशी मागणी केली होती. त्याला मानाच्या गणपती मंडळांनी विरोध केला. त्यानंतर पोलिसांनी दरवर्षीप्रमाणे मिरवणुकीला सुरुवात होईल. त्यांच्या वेळेत कोणताही बदल होणार नसल्याचे सांगितले. विसर्जन मिरवणुकीत प्रमुख मार्गावर ३१



## खासगी ड्रोनला नाही परवानगी, ढोल-ताशांवर निर्बंध

- नागरिकांनी पोलिसांचे कान, डोळे बनावे - पोलीस आयुक्तांचे आवाहन
- खासगी ड्रोनला परवानगी नाही.
- बॉम्बशोधक व नाशक विभागाची ७ पथके कार्यरत राहणार.
- गुन्हेगारांवर नजर ठेवण्यासाठी पाच परिमंडळांत स्पॉटर किटचा वापर
- गेल्या वर्षी ४४ मंडळांवर ध्वनी प्रदूषणाचे गुन्हे दाखल
- मानाच्या गणपतींना ३ तर इतर मंडळांना २ ढोल पथकांना परवानगी
- ८७ ढोल पथकांच्या वादकांना ओळखपत्रांचे वितरण
- एकाच मंडळापुढे वादन करण्याची ढोल पथकांना परवानगी
- एका पथकात ४० ढोल व एकूण १०० जणांना परवानगी
- ढोल ताशे पथकांना टेम्पो पेठांमध्ये आणता येणार नाही.
- यंदा ७ व्या दिवसापर्यंत १२ मंडळांवर ध्वनी प्रदूषणविषयक कारवाई
- ढोल पथकांना उलटे फिरता येणार नाही. मिरवणूक मार्गाने पुढे जावे लागणार.



लावण्यात आले असून, त्याद्वारे मिरवणुकीतील प्रत्येक हालचालीवर नजर ठेवण्यात येणार आहे. शहरात

सीसीटीव्ही कॅमेरे यांचीही मदत घेण्यात येणार आहे. पोलिसांच्या वतीने दोन ठिकाणी ड्रोनद्वारे

आहे. कोणत्याही खासगी ड्रोनला मिरवणूककाळात परवानगी देण्यात येणार नाही.

फरासखाना नियंत्रण कक्ष व मुख्य नियंत्रण कक्ष या ठिकाणी राखीव पोलीस दल ठेवण्यात येणार आहे.

लिमा, वरुण व ५ दंगल नियंत्रण पथके, शिवाजीनगर मुख्यालयात ४ स्ट्रायकिंग फोर्स, मुख्य नियंत्रण कक्षात २ स्ट्रायकिंग फोर्स राखीव ठेवण्यात आले आहेत. बेलबाग चौकात फिरते नियंत्रण कक्ष ठेवण्यात आले आहे. विसर्जन मिरवणुकीच्या सर्व मार्गांची जबाबदारी वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे सोपविण्यात आली आहे.

गणेशोत्सव व मोहरम सणानिमित्त शांतता समिती, मोहल्ला कमिटी, पोलीस मित्र, गणेश मंडळांचे पदाधिकारी, ढोलताशा पथक, डीजे डॉल्बी चालक व मालक अशा विविध घटकांच्या ३७७ बैठका

'लोकमत'मधील वृत्ताची दखल : अन् पोलीस कॉन्स्टेबल संपते ड्यूटीवर हजर

# आयुक्तांकडून कॉन्स्टेबलला मिळाले 'सरप्राईज गिफ्ट'

लोकमत न्यूज नेटवर्क

पुणे : गुन्हे शाखेत (युनिट चार) पोलीस कॉन्स्टेबल म्हणून काम करणाऱ्या शंकर संपते यांना अनंत चतुर्दशीच्या दिवशी कन्यारत्न झाले. याचा आनंद त्यांनी पुन्हा ड्यूटीवर हजर होऊन सर्वांसमवेत साजरा केला. या घटनेची दखल पुणे शहर पोलीस आयुक्त के. व्यंकटेशम यांनी घेतली. त्यांनी संपते यांना मन:पूर्वक शुभेच्छादेखील दिल्या. इतकेच नव्हे, तर एक 'सरप्राईज गिफ्ट'देखील पाठवले. रविवारच्या सकाळी अचानकपणे घरी आलेल्या त्या भेटीने संपते भारावून गेले.

## कन्यारत्न होऊनदेखील ते बंदोबस्ताला हजर

◆ गुरुवारी लाडक्या गणरायाला मोठ्या आनंदात व उत्साहात निरोप दिला. मिरवणुकीच्या दिवशी संपते हे अलका चौकात बंदोबस्ताला होते. घरुन पत्नीचा फोन आल्याने त्यांना जावे लागले. ते पुन्हा कामावर परतले ती गोड बातमी घेऊनच. 'अनंत चतुर्दशीच्या दिवशी संपते यांना कन्यारत्न होऊन ते बंदोबस्ताला हजर' अशा आशयाचे वृत्त 'लोकमत'मध्ये आले होते. 'श्री गणेशाच्या कृपेने माझ्या घरात लक्ष्मी जन्माला आली.'




लोकमतचा प्रभाव

या मथळ्याखालील वृत्त 'लोकमत'ने १४ सप्टेंबर रोजी प्रकाशित केले होते. या वृत्ताची दखल पुणे शहराचे पोलीस आयुक्त के. व्यंकटेशम यांनी घेतली. त्यांनी ही बातमी आपल्या ट्विटरवरुन प्रसिद्ध करुन संपते यांचे कौतुक केले. 'मुलगी झाल्यानंतर तो आनंद सर्वांसोबत साजरा करण्याकरिता संपते विसर्जन मिरवणुकीच्या दिवशी कामावर हजर झाले.

'त्यांनी आपली जबाबदारी पार पाडली. ते आपले हिरो आहेत. त्यांचे मन:पूर्वक अभिनंदन व शुभेच्छा,' असा संदेश त्यांनी ट्विट केला आहे. याशिवाय त्यांनी संपते यांना रविवारच्या दिवशी एक सरप्राईज गिफ्टदेखील पाठवले. त्यात त्यांनी एक पुस्तक व मिठाई त्यांना भेट म्हणून पाठवली आहे.

पोलीस आयुक्तांनी दिलेल्या शुभेच्छा यामुळे आनंद झाला आहे. त्यांनी दिलेले सरप्राईज याकरिता त्यांना धन्यवाद. 'लोकमत'मधील बातमीची दखल घेऊन त्यांनी ती बातमी ट्विट केली. यामुळे खात्यातील अनेक अधिकारी, सहकारी मित्रांनी फोन करून शुभेच्छा दिल्याची भावना संपते यांनी या वेळी व्यक्त केली.

लोकसत्ता – दि. १८ सप्टेंबर, २०१९

# वाहतूक पोलिसांच्या ताफ्यात ८० दुचाकी!

## स्मार्ट सिटी योजनेअंतर्गत पोलिसांना दुचाकींचे वितरण

प्रतिनिधी, पुणे



**शहरातील वाहतुकीची** समस्या दिवसेंदिवस जटिल होत चालली असून ती सोडवण्याच्या दृष्टीने वाहतूक पोलिसांना गस्त घालण्यासाठी स्मार्ट सिटी योजनेअंतर्गत मंगळवारी ८० दुचाकी देण्यात आल्या.

पुणे स्मार्ट सिटी डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन लिमिटेडतर्फे मंगळवारी पोलीस आयुक्तालयात झालेल्या एका कार्यक्रमात या दुचाकी देण्यात आल्या. महापौर मुक्ता टिळक, पोलीस आयुक्त डॉ. के. व्यंकटेशम, सहपोलीस आयुक्त रवींद्र शिसवे, स्मार्ट सिटी कॉर्पोरेशनचे मुख्य कार्यकारी आधिकारी राजेंद्र जगताप, सभागृह नेते श्रीनाथ भिमाले, पृथ्वीराज सुतार, वाहतूक शाखेचे पोलीस उपायुक्त पंकज देशमुख, बजाज कंपनीचे विभागीय व्यवस्थापक गौरव श्रीवास्तव आदी या प्रसंगी उपस्थित होते.

डॉ. व्यंकटेशम म्हणाले, पुणेकरांच्या सुरक्षिततेला पोलिसांनी प्राध्यान्य दिले आहे. वाहतुकीची समस्या सोडविण्यासाठी शहरातील प्रत्येक सिग्नलवर इंटेलिजंट ट्रॅफिक मॅनेजमेंट सिस्टीम (आयटीएमएस) यंत्रणा बसविण्याची आवश्यकता आहे. ही यंत्रणा कार्यान्वित झाल्यानंतर शहरातील वाहतूक समस्या सोडविण्यास मदत होईल.

स्मार्ट सिटी योजनेअंतर्गत देण्यात आलेल्या दुचाकी पोलिसांसाठी उपयुक्त ठरणार आहेत. शहरातील वाहतुकीची समस्या आणि कोंडीमुळे सामान्यांना त्रासाला सामोरे जावे लागते. शहरातील प्रत्येक चौक आणि रस्त्यांवरची समस्या वेगळी आहे, असे टिळक यांनी नमूद केले.

जगताप म्हणाले, शहरात सुधारणा घडविण्यासाठी नागरिकांकडून सूचना मागविण्यात आल्या होत्या. त्यात वाहतूक विषयक सुधारणांबाबतच्या सर्वाधिक सूचना होत्या. अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून वाहतुकीची समस्या सोडविणे शक्य होईल. पुढील टप्प्यात आणखी ६० दुचाकी पोलिसांना देण्यात येणार आहेत.

### स्मार्ट पोलीस ठाणे

औंध येथे स्मार्ट पोलीस ठाणे प्रस्तावित आहे. शहरातील महत्त्वाचे चौक पोलीस विरहित (कॉप फ्री) करून सीसीटीव्ही कॅमेऱ्यांच्या माध्यमातून चौकांमधील घडामोडींवर लक्ष ठेवणे शक्य होईल. त्या माध्यमातून नियमभंग करणाऱ्या वाहनचालकांवर कारवाई करणे शक्य होईल. इंटेलिजंट ट्रॅफिक मॅनेजमेंट सिस्टीम (आयटीएमएस) यंत्रणा कारवाई तसेच कोंडी सोडविण्यासाठी उपयुक्त ठरेल, असे पोलीस आयुक्त डॉ. के. व्यंकटेशम यांनी सांगितले.

PuneMirror - 18 September, 2019

# Weekly review meets yield positive results for city's police force

## Crime rate has dipped since initiative began last year, say cops, with improvements in policing precision, detection

Archana.More
@timesgroup.com
TWEETS @Archana_Mirror

When the 'Tuesday Review Meetings' (TRMs) was kicked off by city police commissioner K Venkatesham in August last year, it drew a lot of ire as many officers dismissed it as a wasteful exercise, diverting them from real issues in their jurisdiction. A year later, a report has recorded a drop in crime rate and other improvements in policing and has credited the transformation to these much-hated meetings.

One of the prime objectives of the initiative was to turn the police officers tech-savvy and hone their detection and precision policing skills. The study has shown that the efforts have paid off, bringing the registered offences remarkably down from 9,552 last year to 5,423 this year.

The meetings also focused on immediate action on complaints received at the police stations and identification of repeat offenders and historysheeters. Between the 50 TRMs held so far, 852 repeat offenders, who have been involved in varied crimes, have been brought to light. The cops could also zero in on 353 hot spots for crime, where body offences, chain snatching and accidents were rampant. These spots were since brought under CCTV camera surveillance and also extra patrolling.

To improve the conviction rate, the cops took to close follow-up on serious offences such as child abuse. The process saw the police graduate from rudimentary maintenance of law and order to visible policing, deploying modern technical methods of detection and traffic management. "One of the main agendas of the review meetings was ensuring correct registration of FIRs, with the police officers registering the offence in a legally sound manner, applying the correct sections of law. As per the rules, each and every complaint application has to be decided or disposed of, within seven days. The weekly meetings helped reduce the pendency by 99 per cent," informed Bachchan Singh, deputy commissioner of police (crime).


Many officers earlier found the TRMs a waste of time, but the results have changed their minds

He added, "Working towards proactive prevention action, the assistant commissioner of police of each division was tasked with shouldering the responsibility. To improve conviction rate we also started reviewing acquittal cases. A prosecution assistance cell was formed to work on investigation as well as prosecution. The cell co-ordinates with the prosecution lawyer, providing the all essential reports and documents related to the case."

Many of the officers involved in the meetings have now conceded that the meetings have helped. "Dattawadi is one of the most sensitive police stations. When I took charge of it I had 215 offences to investigate and 550 applications pending before me. Today, we have only 75 offences pending at the station. The quality of investigation has improved vastly, helping us to score better conviction rate. To start with, it was pretty stressful but now we see the change the meetings have brought on," accepted police inspector Devidas Gheware.

Pointing to other changes effected by the policy decisions taken at the meetings, Rajendra Mokashi, police inspector (crime branch), told Mirror, "Maintaining the muddemal (properties seized in different crimes) was a major challenge for every police station. We used to have properties collected since 1987. Now most of them have been disposed adhering with legal procedure. The remaining have been put together at one place — at the Shivajinagar headquarters. This has helped stall tampering of the properties. The Seva application has also made a difference, steering people to approach the police with a positive mind."

पुढारी – दि. ३ सप्टेंबर, २०१९

# महिलांचा पुणे पोलिसांवर अधिक विश्वास

**पुणे : प्रतिनिधी**

**पुणेकरांमध्ये विश्वास निर्माण करत त्यांना सुरक्षित व भयमुक्त वातावरण देण्यासाठी पोलिस कठोर पावले उचलत असताना पुणे पोलिसांवर पुरुषांच्या तुलनेत महिलांचाच अधिक विश्वास असल्याचे एका पाहणीतून समोर आले. एका शैक्षणिक संस्थेने केलेल्या सर्वेक्षणातून ही बाब समोर आली.**

पुणे पोलिसांनी प्रथमच एका त्रयस्त बाजूने पोलिसांच्या एकूणच कामकाजाची पाहणी केली. यापूर्वी २०१४ मध्ये एका शिक्षण संस्थेकडून नागपूर पोलिसांचे सर्वे क्षण के ले गेले होते. त्यानंतर असे सर्वेक्षण पुण्यात झाले आहे. राज्यातील पोलिसांविषयीचे हे दुसरे सर्वेक्षण ठरले. याला प्रभावी पोलिस प्रशासनाच्या आकलन आणि अपेक्षांबद्दलचे सर्वेक्षण असे नाव देण्यात आले. ही पाहणी १८० विद्यार्थ्यांनी २ हजार ३३२ नमुने घेऊन केली. यात ७ शिक्षकांचा सदस्य गट तयार करण्यात आलेला होता. यासाठी प्रश्नावली तयार करून एक ते पाच रेटिंग व टक्केवारीमध्ये माहिती घेतली गेली. पोलिसांच्या भूमिकेबद्दल नागरिकांमधील जागरूकता, पोलिसांना सहकार्य करण्याची नागरिकांची तयारी, पोलिसांपर्यंत पोहोचण्याविषयी नागरिकांचा सकारात्मक विचार व संपर्कक्षमता, पोलिसांच्या सकारात्मक वागणुकीबद्दल नागरिकांचे विचार, पोलिसांच्या कार्यात्मक परिणामकारतेविषयी नागरिकांचे विचार आणि पोलिसांची नागरिकांमधील सकारात्मक प्रतिमा या गोष्टींवर हे सर्वेक्षण करण्यात आले.



जनसामन्यांमधील पोलिसांच्या प्रतिमेला पुणेकरांनी ६७ गुण दिलेले आहेत. या सर्वेक्षणात मते अजमावून घेण्यात आलेल्या एकूण नागरिकांपैकी ४५ टक्के नागरिकांनी तक्रार शांतपणे नोंदवून घेणे, ५० टक्के नागरिकांनी सुरक्षित वाटेल असे वागावे असे मत नोंदवले. पोलिसांनी विनयशील व नम्र असले पाहिजे, अशी अपेक्षा ४८ टक्के नागरिकांनी व्यक्त केली. चोरी किंवा अपघात झालेल्या ठिकाणी पोलिसांनी त्वरित पोहोचले पाहिजे, अशी ५६ टक्के नागरिकांची मागणी आहे.

## पोलिसांची नागरिकांमधील सकारात्मक प्रतिमा

गेल्या पाच वर्षांत पोलिसांच्या कामात प्रगती झाली.
पोलिस ठाण्यात तक्रार दाखल करण्यास भीती वाटत नाही.
महिला तसेच ज्येष्ठांच्या सुरक्षेसंदर्भात पोलिस विलक्षण सतर्क असतात.
पोलिसांच्या सहवासात नागरिकांना सुरक्षित वाटते.

## पुणेकरांची पोलिसांना सूचना

पारंपरिक आणि सोशल मीडियातून आपली प्रतिमा उंचवावी.
कॉर्पोरेट असोसिएशन कार्यक्रमांचे आयोजन करावे.
नागरिकांपर्यंत पोहोचण्यासाठी उपक्रम घ्यावेत.
विद्यार्थ्यांसमवेत कार्यक्रम आयोजित करावेत.
पोलिसांना व्यक्तिमत्त्व विकासासाठी खास प्रशिक्षण द्यावे.

## वाहतूक पोलिसांनो, नम्र व्हा!

प्रत्येक पुणेकरांशी थेट संबंध हा वाहतूक पोलिसांशी येतो. कारवाईमुळे सतत वाहनचालक व पोलिसांशी वाद होतात. त्यामुळे पोलिसांची इमेज खराब होते, असे काहीजण खासगीत बोलतात. या पाहणीदरम्यानही वाहतूक पोलिस नम्र नसल्याचे समोर आले आहे. तसेच, वाहतूक पोलिसांनी नम्र होत नागरिकांसोबत विनयशील वागावे, अशी अपेक्षा पुणेकरांनी व्यक्त केली आहे.

## पुणे सर्वेक्षणातील अपेक्षांची टक्केवारी

| विषय | नागपूर (२०१४) | पुणे (२०१८) |
|---|---|---|
| जागरूकता | ३३ टक्के | ७७ टक्के |
| पोलिसांना पाठिंबा देण्याची तयारी | ३४ टक्के | ७० टक्के |
| संपर्कक्षमता | २४ टक्के | ६२ टक्के |
| कार्यात्मक परिणामकारकता | २० टक्के | ६४ टक्के |
| पोलिसांची वागणूक | १७ टक्के | ६२ टक्के |
| पोलिसांची जनसामान्यातील प्रतिमा | १९ टक्के | ६७ टक्के |

## पुणे पोलिसांना हे साध्य करावे लागणार

- पुरुषांच्या तुलनेत महिला पोलिसांच्या कामावर खूष आहेत. यामुळे पुरुषांचाही विश्वास मिळवावा लागेल.
- अल्पशिक्षित लोकांचा पोलिसांवर अधिक विश्वास. सुशिक्षितांचाही विश्वास जिंकावा लागेल.
- तरुणांच्या तुलनेत ज्येष्ठ नागरिकांचा पोलिसांबरोबर चांगला संवाद आहे. त्यानुसार तरुणांशी संवाद वाढवावा लागेल.
- तक्रारदारांसोबत महिला पोलिस चांगला संवाद साधतात. त्यामुळे पुरुष पोलिसांनाही चांगला संवाद निर्माण करावा लागणार आहे.

## या आहेत पुणेकरांच्या अपेक्षा

- तक्रार घेऊन गेलेल्या तक्रारदारास प्रश्नांचा भडिमार करू नये
- तक्रारी शांतपणे ऐकून घ्याव्यात
- तक्रारदारास सुरक्षित व आश्वस्त असे वागावे
- पोलिसांनी विनयशील व नम्र असावे
- चोरी तसेच अपघाताच्या ठिकाणी तातडीने पोहोचावे

# कडेकोट बंदोबस्ताने विसर्जन मिरवणूक निर्विघ्न

- बंदोबस्तासाठी ३० दिवसांत पोलिसांनी घेतल्या ३३७ बैठका
- २६ तास पोलिसांचा खडा पहारा



बंदोबस्त क्लोज केल्यानंतर पोलिस कर्मचाऱ्यांसह अधिकारी

**पुणे : प्रतिनिधी**

वैभवशाली गणेशोत्सव विसर्जन मिरवणुकीसाठी पोलिसांच्या वतीने तगडा पोलिस बंदोबस्त ठेवण्यात आला होता. बंदोबस्ताची खास तयारी करण्यासाठी पोलिस आयुक्तांनी शहरातील विविध ठिकाणी केवळ एका महिन्यात ३३७ बैठका घेतल्या होत्या. या बैठकांचा सूक्ष्म अभ्यास करून नियमांची काटेकोर अंमलबजावणी करीत पोलिसांनी हे दिव्य लीलया पेलले. त्यामुळे यंदाची विसर्जन मिरवणूकदेखील शांततेत निर्विघ्नपणे पार पडली. यासाठी पोलिसांनी तब्बल २६ तास शहराच्या विविध भागांत खडा पहारा दिला.

या बंदोबस्तामध्ये पोलिसांच्या वतीने अत्याधुनिक तंत्रज्ञानाचादेखील कौशल्याने वापर केला होता. विसर्जन मिरवणुकीवर पोलिसांसोबतच तिसऱ्या डोळ्याची काटेकोर नजर होती. यासाठी पोलिसांनी 'सी-वॉच' उपक्रमातील कॅमेऱ्यासह तब्बल २८ हजार सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची मदत घेतली. तसेच, 'स्पॉटर कीट' या प्रणालीचा वापर करण्यात आला होता. सराईत गुन्हेगारांवर 'स्पॉटर कीट'च्या माध्यमातून नजर ठेवण्यात येत होती. तसेच, फरासखाना पोलिस ठाण्यामध्ये कॅमेऱ्यांची भव्य वॉल उभारण्यात आली होती. याद्वारे मुख्य नियंत्रण कक्षातून मिरवणुकीतील सर्व हालचालीवर बारीक लक्ष ठेवण्यात येत होते. या बंदोबस्ताच्या कालावधीसह पोलिस आयुक्त डॉ. रवींद्र शिसवे यांनी २४ तासांत २७ किलोमीटरचा पायी प्रवास केला.

पुढारी – दि. २३ सप्टेंबर, २०१९

# 'हॉट स्पॉट'वर असणार तिसऱ्या डोळ्याची नजर



पुढारी वॉच

**पुणे : अक्षय फाटक**

शहरातील वाढत्या गुन्ह्यांना पायबंद घालण्यासाठी आता निवडक 'हॉट स्पॉट'वर पोलिस तिसऱ्या डोळ्याद्वारे नजर ठेवणार आहेत. त्यासाठी पोलिसांनी जवळपास साडेतीनशे हॉट स्पॉट निवडलेले असून, त्यांतील निम्याहून अधिक ठिकाणे सीसीटीव्हीच्या नजरेखाली आणण्यात आलेली आहेत.

वेगवेगळ्या माध्यमातून सराइतांवर वचक ठेवण्याचा प्रयत्न केला जात आहे. त्यासाठी चेकिंग मोहीम राबवीत, त्यांना आयुक्तालयात पाचारण केले जात आहे. काही जणांवर विशेष लक्ष ठेवले जात आहे. तर, दुसरीकडे पॅट्रोलिंग, गस्त तसेच दामिनी पथक, बीट मार्शलच्या माध्यमातून रस्त्यांवरील पोलिसिंग वाढवीत गुन्ह्यांना आळा घालण्याचे प्रयत्न होत आहेत. तरीही काही केल्या रस्त्यावरची गुन्हेगारी कमी होत नसल्याचे दिसत नसल्याने आणखी कडक पावले उचलण्याचा निर्णय पोलिसांनी घेतला.

गेल्या वर्षी पोलिस आयुक्त डॉ. के. व्यंकटेशम यांनी शहरातील ज्या भागात वारंवार अशांतता निर्माण होते, अशांची माहिती संकलित केली होती. त्याचा अभ्यास करून अशी ३०१ 'हॉट स्पॉट' (संवेदनशील ठिकाणे) निवडली गेली. त्यावर लक्ष ठेवत गुन्हे नियंत्रणासाठी प्रयत्न केले गेले. त्यात कोणत्या भागातून कॉल येतात, ते कोणत्या स्वरूपाचे आहेत, तसेच वेळ कोणती व किती कॉल येतात, असे विश्लेषण करण्यात आले होते. त्यानंतर दुसऱ्या टप्प्यात घरफोडी, वाहनचोरी, महिला सुरक्षा, तसेच अपघात या घटनांचे विश्लेषण करण्यात आले. त्यातून ३५३ 'हॉट स्पॉट' निवडण्यात आले आहेत. त्या ठिकाणी पोलिसांची पॅट्रोलिंग वाढविण्यात आली. मात्र, मनुष्यबळाच्या कमतरतेमुळे पोलिसांनी आता तिसऱ्या डोळ्याचा आधार घेतला.

अशा ठिकाणी आता सीसीटीव्हींची नजर ठेवली जाणार आहे. यातील जवळपास १६० हून अधिक ठिकाणे सीसीटीव्हीच्या निगराणीखाली आलेले आहेत. उर्वरित ठिकाणी सीसीटीव्ही बसविण्याचे काम करण्यात येत आहे. पुणेकरांच्या सहकार्याने हे सीसीटीव्ही बसविण्यात येत आहेत. त्यामुळे आता गुन्हा लवकरात लवकर उघडकीस आणण्यास तसेच आरोपींचा माग काढण्यास मदत होणार आहे. तसेच, त्याचा न्यायालयात डिजिटल पुरावा म्हणूनही वापर करता येणार आहे. शहरात व्यावसायिक, दुकानदार तसेच विविध कंपन्या व सोसायटी धारकांच्या सहकार्याने पुणे पोलिसांनी ३३ हजार सीसीटीव्ही सामावून घेतलेले आहेत.

कुख्यात टोळ्यांचे म्होरके म्हणा किंवा त्यांचे सदस्य पोलिसांना घाबरतात, पण नवीन उदयास आलेले गुंड घाबरत नसल्याची स्थिती आहे. कोयत्यांचा वापर वाढल्याने कोयते विक्रेत्यांवरच जोरदार कारवाई पोलिसांनी सुरू केली. पण, पुणे पोलिसांची 'नाचता येईना अन् अंगण वाकडे', अशीच काहीशी परिस्थिती झाल्याचे बोलले जात आहे. गुन्हेगारी रोखता येईल म्हणून विक्रेत्यांवर कारवाई सुरू केली का, असेही आता सर्व सामान्य नागरिक बोलू लागले आहेत. कायद्याच्या चौकटीत बसवून ही कारवाई केली जात आहे. परंतु, वर्षानुवर्षे विक्री होती. मग, आताच असे पाऊल का, असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

पुण्यनगरी – दि. ७ सप्टेंबर, २०१९

# पुणे पोलिसांकडून बाराशे शिक्षकांचा सन्मान



## ८३५ शाळांना पोलीस अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या भेटी

### सोशल मीडियाच्या गैरवापराबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन

▮ पुणे : प्रतिनिधी

शिक्षक दिनानिमित्त पुणे शहर पोलीस दलातील पाच परिमंडळांतील ८३५ शाळांना पोलीस अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी भेटी दिल्या. तसेच शाळेतील बाराशे शिक्षकांना शुभेच्छापत्र आणि पुष्प देऊन त्यांचा सन्मान केला.

पोलीस आयुक्त डॉ. के. व्यंकटेशम यांनी भवानी पेठेतील रफी अहमद किडवाई उर्दू माध्यमिक विद्यालय आणि ज्युनिअर कॉलेज ऑफ सायन्स आणि सावित्रीबाई फुले प्रशाला आणि कनिष्ठ महाविद्यालय या शैक्षणिक संस्थांना भेट देत शिक्षकांना पुष्प, तसेच शुभेच्छापत्र दिले. सोशल मीडियाच्या वापराचा अतिरेक आणि गैरवापरामुळे होणारे तोटे याबाबत शाळांमधील विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. यावेळी अपर पोलीस आयुक्त अशोक मोराळे, परिमंडळ एकच्या उपायुक्त स्वप्ना गोरे, पुणे महापालिकेचे शिक्षणाधिकारी दीपक माळी, पोलीस निरीक्षक क्रांती पवार, खडक पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक भरत जाधव, मुख्याध्यापिका यास्मिन खान, मुख्याध्यापक सचिन मार्कट आदी उपस्थित होते.

सकाळ – दि. ४ सप्टेंबर, २०१९

# पोलिसांच्या चेहऱ्यावर आनंद

## कुटुंबीयांच्या हस्ते पदोन्नतीची फीत; आयुक्तालयात अनोखा कार्यक्रम

**पुणे, ता. ३ : वर्षानुवर्षे पुणे पोलिस दलामध्ये विविध पोलिस ठाण्यांमध्ये पोलिस कर्मचारी कार्यरत असतात. त्यापैकी काहींची सातत्याने विविध पदांवर पदोन्नती होते. त्यानंतर शासकीय चौकटीत होणाऱ्या कार्यक्रमात पदोन्नती स्वीकारली जाते. मात्र, मंगळवारी विविध पदांवर पदोन्नती मिळालेल्या पोलिसांच्या खांद्यावर पदोन्नतीची फीत लावण्याचा मान त्यांच्या कुटुंबीयांना मिळाला. पोलिस आयुक्तांच्या उपस्थितीत व कुटुंबीयांच्या साक्षीने पार पडलेल्या या कार्यक्रमावेळी पोलिसांच्या चेहऱ्यावर आनंद झळकला.**



पोलिस आयुक्तालय : विविध पदांवर पदोन्नती मिळालेल्या पोलिस कर्मचाऱ्यांच्या खांद्यावर पदोन्नतीची फीत लावताना पोलिस आयुक्त डॉ. के. वेंकटेशम व पोलिस कर्मचाऱ्यांचे कुटुंबीय. समवेत अशोक मोराळे, डॉ. संजय शिंदे, संभाजी कदम.

पुणे पोलिस दलाच्या वतीने मंगळवारी पोलिस आयुक्तालयातील सभागृहामध्ये पोलिस नाईक ते सहायक फौजदार अशा विविध पदांवर पदोन्नती झालेल्या ५१ अंमलदारांचा सत्कार करण्यात आला. या वेळी पोलिस आयुक्त डॉ. के. वेंकटेशम, सह पोलिस आयुक्त डॉ. रवींद्र शिसवे, अपर पोलिस आयुक्त (गुन्हे) अशोक मोराळे, डॉ. संजय शिंदे, पोलिस उपायुक्त संभाजी कदम, सहायक पोलिस आयुक्त मिलिंद पाटील, कल्याणराव विधाते आदी उपस्थित होते.

वयाच्या विसाव्या वर्षी पोलिस दलामध्ये भरती झालेला कर्मचारी त्याच्या सेवानिवृत्तीपर्यंत चोवीस तास कर्तव्य बजावण्याचे काम करतो. नागरिकांच्या सुरक्षेला प्राधान्य देताना तो कुटुंबापासून दुरावतो. ही बाब गांभीर्याने लक्षात घेऊन डॉ. वेंकटेशम यांनी काही महिन्यांपासून पदोन्नतीच्या कार्यक्रमामध्ये पोलिसांच्या कुटुंबीयांना आवर्जून सहभागी करून घेतले. तेवढ्यावरच न थांबता पदोन्नतीची फित किंवा स्टार लावण्याचा मान वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांबरोबरीने त्यांच्या कुटुंबातील सदस्यांनाही देऊन त्यांचाही सन्मान केला. मंगळवारी ५१ पोलिसांच्या कुटुंबीय, मित्र, आप्तेष्टांनी या कार्यक्रमात आवर्जून सहभाग घेतला.

> **पदोन्नती हा प्रत्येकाच्या आयुष्यातील आनंदाचा क्षण असतो. अशा क्षणामध्ये कुटुंबीयांचाही सहभाग असावा, यादृष्टीने या कार्यक्रमात पोलिसांच्या कुटुंबीयांनाही आमंत्रित केले. पोलिसांनी पदोन्नतीबरोबरच येणाऱ्या नव्या जबाबदारीचे आव्हान पेलणे आवश्यक आहे.**
>
> **डॉ. के. वेंकटेशम**, पोलिस आयुक्त

# पोलिसांमधला कवी जागा व्हावा

## नागराज मंजुळे यांची अपेक्षा; 'पोलिस फाइल्स'चे प्रकाशन

> पोलिसांबाबत जनतेने विश्वास दाखवला तर आणखी जोमाने काम करता येईल. पोलिसांनी बोलते व्हायला हवे. पोलिस बोलत नाहीत, याचा अर्थ त्यांना भावना नाहीत असे नाही.
> **– डॉ. मीरा बोरवणकर**, माजी पोलिस महासंचालक

**पुणे, ता. २१ :** "पोलिस अकार्यक्षम असल्याचे बोलले जाते; परंतु समाज म्हणून आपण आपली जबाबदारी पाळतो का, पोलिस रात्रंदिवस आपल्या सुरक्षेसाठी तैनात असतात, त्यांचे अनुभव पुस्तकरूपात येणे महत्त्वाचे होते. पोलिसांमध्ये दडलेला कवी, लेखक, कलाकार जागा झाला पाहिजे," असे मत दिग्दर्शक नागराज मंजुळे यांनी व्यक्त केले.

पुणे इंटरनॅशनल लिटररी फेस्टिव्हलमध्ये विश्वकर्मा पब्लिकेशन्सतर्फे प्रकाशित व पोलिस आयुक्त डॉ. के. वेंकटेशम यांच्या संकल्पातून साकारलेल्या 'पोलिस फाइल्स' या पुस्तकाचे प्रकाशन मंजुळे यांच्या हस्ते झाले. या वेळी माजी पोलिस महासंचालक डॉ. मीरा बोरवणकर, डॉ. वेंकटेशम, अपर पोलिस महासंचालक अतुलचंद्र कुलकर्णी, पोलिस सहआयुक्त डॉ. रवींद्र शिसवे, विश्वकर्मा ग्रुपचे अध्यक्ष राजकुमार अगरवाल, विश्वस्त ॲड. प्रताप परदेशी, मुख्य कार्यकारी अधिकारी विशाल सोनी व पुस्तकाच्या समन्वयिका विद्युला टोकेकर उपस्थित होत्या.

"वर्दीतल्या कठोर पोलिसांतही एक संवेदनशील माणूस असतो, तो माणूस 'पोलिस फाइल्स' या पुस्तकामधून व्यक्त झाला आहे," असे सांगून मंजुळे म्हणाले, "पोलिस आपल्या जिवाची पर्वा न करता वेगवेगळ्या अंगाने गुन्हे उघडकीस आणतात, त्यांचे हेच जगणे मी एका लघुपटाद्वारे प्रेक्षकांसमोर मांडणार आहे." "पोलिस प्रज्ञाशील असतात. विविध परिस्थितीत गुन्ह्यांचा उलगडा करतात. त्यांच्या कुशलतेला शब्दबद्ध करून लोकांसमोर आणण्याचा प्रयत्न केला आहे. तपासादरम्यान पोलिसांना वेगवेगळे अनुभव येतात. हे अनुभव पुस्तकरूपात आल्यामुळे आता पोलिस अधिकारी व कर्मचारी आपले अनुभव कथेत मांडतील," असे डॉ. वेंकटेशम यांनी सांगितले. कुलकर्णी म्हणाले, "या पोलिस कथांमधून इतर पोलिस अधिकारी लिहिते होतील. पोलिसांसंबंधित संशोधनात आपण योगदान द्यावे. त्यासाठी विविध संस्थांबरोबर सामंजस्य करार करत आहेत." सूत्रसंचालन संतोष घुले यांनी केले.

TEACHERS' DAY 2019

# Police officials meet and greet teachers in 835 schools in city



**NOTHING GREATER THAN TEACHING:** Commissioner of Police Dr K Venkatesham (Front Centre), Add CP Ashok Morale and DCP Swapna Gore visit Rafi Ahmed Kidwai Urdu High School on the occasion of Teachers' Day in Bhavani Peth on Thursday.

ST CORRESPONDENT
reporters@sakaaltimes.com

**PUNE:** As part of their community outreach programme, the Pune city police officials visited 835 schools on Thursday on the occasion of Teachers' Day.

The police officials wished the teachers and handed over flowers and greeting cards with details of police units and helpline numbers.

"Teachers blessings create enlightened citizens (who talk and walk the talk ) & thereby reduce the load on police, criminal justice system. We need Blessings in abundant," tweeted Pune Police Commissioner Dr K Venkatesham. Venkatesham along with Crime Branch Additional Commissioner Ashok Morale DCP (Zone 1) Swapna Gore visited Rafi Ahmed Kidwai School and Shrimati Savitribai Phule Prashala in Bhawani Peth and congratulated the teachers. A total of 835 schools and colleges were visited by senior police inspectors who are in charge of the 30 police stations and traffic branch under the Commissionerate, as well as divisional ACPs and zonal DCPs. They handed over greeting cards to about 1,200 teachers.

> The police officials wished the teachers and handed over flowers and greeting cards with details of police units and helpline numbers.

Sakal Times - 14 September, 2019

# Pune police managed immersion in 24 hrs

SUNIL PRADHAN
reporters@sakaaltimes.com

**ACTION TAKEN**

- Police officials lodged 12 cases of noise pollution and 10 sound systems were seized by the city police for violating norms of noise pollution.

**PUNE:** Pune City Police Commissioner K Venkatesham thanked all Ganesh mandals for their cooperation which helped the city police complete the immersion process in 24 hours, which is about two-and-half hours earlier compared to last year. It was the first time the city police completed the immersion process in 24 hours in last one decade.

Speaking about the immersion process, Venkatesham said that the event was incident-free and people enjoyed a lot in the immersion process. "Thanks to the synergy between police officials and citizens, police officials initiated a number of citizen-friendly measures aimed at facilitating citizens with the best of police services," he said.

Continued on P2

# Pune police managed...

"We also conducted numerous meetings and follow-ups with the mandals which helped us in the coordination and completion of the immersion process," said Venkatesham.

Citizens and Ganesh mandals appreciated the efforts of the police for completing the immersion procession. .

This year 290 mandals were on Laxmi Road while 196 were on Tilak Road, 46 on Kumathekar Road and 70 on Kelkar Road. A total of 602 mandals took immersion passes from the police.

# 60 addl CCTVs to be installed in Peth areas

MUBARAK ANSARI
@VictrForceGhazi

**PUNE:** To make central Pune (Peth areas) congestion-free, 60 CCTV cameras will be installed at 23 chowks and live footage will be monitored by the Pune city police traffic branch from its headquarters in Yerawada. The footage will also be monitored from its local Vishrambaug traffic division.

SAKAL TIMES SPECIAL

DCP (Traffic) Pankaj Deshmukh floated a tender on Wednesday for selection of agency for design, implementation, operations and maintenance of CCTV-based surveillance system for Pune Traffic Police.



According to Pune police officials, the traffic branch intends to stabilise the traffic conditions by ensuring space for free-flow of traffic without congestions in Peth areas majorly in Vishrambaug traffic division and nearby areas. The Peth areas in Vishrambaug jurisdiction are heavily populated in terms of residential as well by the commuting crowd throughout the city due to religious destinations and shopping availabilities.

The traffic branch has marked certain roads as one-way traffic roads to ensure the minimal traffic congestions.

To bring these areas under CCTV surveillance as well as to ensure enforcement of traffic rules, CCTV-based surveillance system will be installed in the areas. These are an addition to the already existing CCTV cameras at major chowks.

The traffic branch has approximately 1,100 personnel and a total of 24 traffic divisions under its jurisdiction.

Due to manpower shortage to enforce laws, the police have CCTV command centre to monitor live traffic movement and issue e-challan and send to addresses of the violators accordingly. The violators are also made to pay at chowks if caught by police.

## PROJECT OBJECTIVE

- To reduce traffic congestion and ensure space for free flow of traffic.
- To ensure the minimal violations of traffic rules.
- To ensure citizen satisfaction by improving the on-road traffic conditions by effective use of technology and by penalising violators.

# Traffic police share online link to check diversions

■ ST CORRESPONDENT
reporters@sakaaltimes.com

**PUNE:** The traffic branch of Pune city police have advised people to visit www.PuneTrafWatch.com for information on road closures, diversions due to Ganpati immersion processions on Thursday and Friday.

Traffic diversions, road closures and restrictions will




be in place and an internal ring road will be earmarked for connecting the diverted routes for the traffic flow during this period.

The traffic branch has released a list of roads, which will be closed for traffic till the processions are over on the next day. Shivaji Road and Laxmi Road will remain closed from 7 am on Thursday, while Guru Nanak Road, Tilak Road and Bagade Road will remain closed from 9 am onwards.

Ganesh Road and Kelkar Road will remain closed from 10 am while Bajirao Road, Kumthekar Road and Shastri Road will remain closed from noon. Jangli Maharaj Road, Karve Road, Fergusson College Road, Bhandarkar Road, Pune-Satara Road and Prabhat Road will remain closed for traffic from 4 pm onwards.

Sakal Times - 23 September, 2019

# Police chief launches book 'Police Files'




**AT THE LAUNCH:** (L To R) Maharashtra CID Chief Atulchandra Kulkarni, Director Nagraj Manjule, IPS Officer Meeran Borwankar, Pune Police Chief K Venkatesham at the launch of the book 'Police Files' at Yashada, Baner on Friday. ANAND CHAINI

ST CORRESPONDENT
reporters@sakaaltimes.com

**PUNE:** The Police Commissioner of Pune K Venkatesham on Friday evening launched a book, 'Police Files,' which narrates the stories of police officials while investigating and handling criminal cases. The book was conceptualised by the police chief himself and was published by Vishwakarma Publications and was launched at Pune

## STORIES OF POLICE OFFICIALS

International Literary Festival at Yashada in Baner. IPS Officer Meeran Borwankar, who retired as DG Bureau of Police Research & Development (BPRD), Maharashtra CID Chief Atulchandra Kulkarni, Director Nagraj Manjule, Chairman of Vishwakarma group Rajkumar Agarwal and other dignitaries were present for the book launch event.

Speaking at the event, Borwankar said that it is essential to reflect on the contribution of police officials in society and literature is one medium, which can be used for the same.

"While only few stories can be accommodated in a book, the book is a small reflection of the immense work done by the police department while solving each case," added Borwankar.

Forty best stories from over 200 were selected for publication.

Police Chief K Venkatesham said, "Literature is the culture of the city and so we just thought to contribute to the same."

Speaking at the launch, Maharashtra CID Chief Kulkarni said that police officials are supposed to be reticent and composed, as they cannot explain much in such literary piece or it would benefit the criminals.

सामना - दि. २८ सप्टेंबर, २०१९

# गुन्ह्यांमध्ये हस्तगत केलेला मुद्देमाल नागरिकांना परत

पुणे, दि. २७ (प्रतिनिधी - शहरातील विविध पोलीस ठाण्यांच्या हद्दीत दाखल ९१ गुन्ह्यांत चोरी गेलेला मुद्देमाल जप्त करून नागरिकांना परत करण्यात आला. सोन्या - चांदीचे दागिने, रोख रक्कम, मोबाईल यांसह वाहने असा एकूण १ कोटी ५ लाख ६७ हजार ६२५ रुपयांचा ऐवज पुन:प्रदान करण्यात आला. चोरी गेलेला मुद्देमाल परत मिळाल्यामुळे नागरिकांनी पोलिसांचे आभार मानत आनंद व्यक्त केला.

घरफोडी, सोनसाखळी चोरी अशा विविध गुन्ह्यांत चोरी गेलेला मुद्देमाल पुन: प्रदान करण्याचा कार्यक्रम शुक्रवारी पोलीस आयुक्त कार्यालय येथे पार पडला. पोलीस आयुक्त के. व्यंकटेशम् यांच्या हस्ते नागरिकांना मुद्देमाल प्रदान करण्यात आला. यावेळी पोलीस सहआयुक्त रवींद्र शिसवे, अपर पोलीस आयुक्त, पूर्व प्रादेशिक विभाग सुनील फुलारी, अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) अशोक मोराळे, अपर पोलीस आयुक्त (प्रशासन) संजय शिंदे आदींसह नागरिक यावेळी उपस्थित होते. नागरिकांना मुद्देमाल परत मिळाल्याने त्यांनी पोलिसांचे आभार मानले. दरम्यान, यापूर्वी ऑगस्ट २०१९ मध्ये ६९ गुन्ह्यांतील १ कोटी १८ लाख ७० हजार ९०० रुपयांचा मुद्देमाल परत देण्यात आला होता. या वर्षभरात पुणे पोलिसांकडून एकूण १० कोटी ६३ लाख १५ हजार २७७ रुपयांचा मुद्देमाल परत करण्यात आला आहे. यावेळी बोलताना पोलीस आयुक्त के. व्यंकटेशम् म्हणाले, नागरिकांना त्यांचा मुद्देमाल लवकरात लवकर मिळावा, यासाठी पोलिसांकडून प्रयत्न सुरू आहेत. याचाच एक भाग म्हणून मुद्देमाल पुन:प्रदान कार्यक्रम दर महिन्याला घेण्याचा विचार करण्यात येत आहे.




शहरातील विविध पोलीस ठाण्यांच्या हद्दीत दाखल ९१ गुन्ह्यांत चोरी गेलेला एक कोटीचा मुद्देमाल पोलीस आयुक्त के. व्यंकटेशम् यांच्या हस्ते नागरिकांना शुक्रवारी परत करण्यात आला.

TIMES OF INDIA - 16 September, 2019

# Police SUVs used to carry rescued women vanish

Gitesh.Shelke@timesgroup.com

**Pune:** Two special SUVs provided by the Centre to the city police to carry girls and women rescued from brothels, massage parlours and spas seem to have vanished into thin air.

The two sports utility vehicles (SUVs), which were allowed to have tinted glass to conceal the identities of the rescued women, are reported "missing" for the past three years and the city police are completely clueless about the cars' whereabouts.

Under such circumstances, the police's anti-human trafficking unit is now compelled to use an outdated van to carry the rescued women.

Neither the anti-human trafficking unit nor the motor transport department authorities of the city police have any information about the vehicles provided to them eight years ago by the Union women and child development ministry.

Police commissioner K Venkatesham said, "I will look into the issue and ensure that the anti-human trafficking unit gets back the two vehicles."

The Centre had provided such special vehicles to all anti-human trafficking units across the country about eight years ago and the Pune city police got two.

"One of the vehicles was supposed to be used by the police within the city and the Pimpri Chinchwad limits. The other vehicle was meant to carry out operations in the rural parts of Pune and neighbouring districts such as Satara, Ahmednagar and Solapur," a senior police officer said.

"The law does not allow use of tinted glasses on the vehicles. But the government observed that many people tend to peep inside the vehicles carrying the rescued women to court or hospitals. Keeping this in mind, the government allowed use of dark glasses on these two vehicles to safeguard the privacy of the girls and women rescued from sex rackets," the officer said.

When contacted, an official at the Shivajinagar police headquarters who maintains the entire fleet of vehicles belonging to the city police, said "We are clueless about such vehicles. At the same time, we would like to maintain that we have not discarded any such vehicle in the last two or three years."

He added, "We will also check if the vehicles have been given to the Pimpri Chinchwad police commissionerate? If not, the vehicles must be in use in some part of the city or other."

In the past few months, the anti-human trafficking unit has carried out a number of raids in massage parlours and spas in the upscale localities such as Baner, Koregaon Park, Kalyaninagar and Mundhwa and at the red light areas of Budhwar Peth.

The police, during such raids, rescued several women from West Bengal, Mumbai, Delhi and Uttar Pradesh and also countries like Thailand and Uzbekistan.

## THE PROTOCOL

Police personnel posted with the **anti-human trafficking** unit gather information on **sex rackets** in the city and the district

- Following tip-offs, decoy customers are sent to spas, massage parlours, brothels and hotels
- Police conduct raids only after confirmatory calls from the decoys
- They rescue the girls and women and send them to hospital for medical check-ups
- They are then sent to observation homes
- Every year, Pune police rescue **200-300** girls and women

## The Special Vehicles



- The two SUVs, which were allowed to have tinted glass to conceal the rescued women's identity
- The vehicles are "missing" for three years. The anti-human trafficking unit is using an outdated van now
- The Centre had provided such special vehicles to all anti-human trafficking units across the country eight years ago. Pune city police got two vehicles

**सकाळ** – दि. २२ सप्टेंबर, २०१९



पुणे : पुणे शहर व्यापारी असोसिएशनतर्फे पोलिस आयुक्त डॉ. के. वेंकटेशम यांचा सत्कार करण्यात आला. या वेळी (डावीकडून) संकेत ओसवाल, दीपक जैन, चंदुलाल ओसवाल, सुरेश जैन, डॉ. वेंकटेशम व दशरथ कवाड.

# पोलिस आयुक्त डॉ. वेंकटेशम यांचा सत्कार

पुणे, ता. २१ : दहशतवादी हल्ल्याचे सावट असतानाही यंदाचा गणेशोत्सव व विसर्जन मिरवणूक निर्विघ्नपणे आणि चोवीस तासांच्या आत संपविण्यात पुणे पोलिसांनी महत्त्वाची भूमिका पार पाडली. त्याबद्दल पुणे शहर व्यापारी असोसिएशनच्या वतीने पोलिस आयुक्त डॉ. के. वेंकटेशम यांचा अध्यक्ष सुरेश जैन यांच्या हस्ते मानचिन्ह देऊन गुरुवारी (ता. १९) सत्कार करण्यात आला.

अध्यक्ष जैन तसेच दशरथ कवाड, दीपक जैन, चंदुलाल ओसवाल, संकेत ओसवाल या पदाधिकाऱ्यांच्या शिष्टमंडळाने आज पोलिस आयुक्त डॉ. वेंकटेशम यांची भेट घेऊन सत्कार केला. या वेळी डॉ. वेंकटेशम यांनीही पदाधिकाऱ्यांसमवेत विविध प्रश्न, उपक्रमांबाबत दिलखुलास संवाद साधला.

"पुणेकर व गणेशोत्सव मंडळांच्या सहकार्यामुळेच यंदाची विसर्जन मिरवणूक चोवीस तासांत व शांततेत पार पडली. यापुढेही ही परंपरा कायम राहील. शहरातील गुन्हेगारी रोखण्यासाठी व्यापारी वर्गाने आपापल्या परिसरात सीसीटीव्ही कॅमेरे लावण्यास प्राधान्य द्यावे," असे आवाहन डॉ. वेंकटेशम यांनी केले.

**लोकमत** – दि. ३ सप्टेंबर, २०१९




# डॉ. के. व्यंकटेशम यांच्या हस्ते पोलीस खेळाडूंचा सत्कार

पुणे : पुणे शहर आणि पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयाकडून घेण्यात आलेल्या क्रीडा स्पर्धात उत्तम कामगिरी करुन, यश मिळविणाऱ्या पोलीस खेळाडूंचा शिवाजीनगर पोलीस आयुक्तालयात पुणे शहर पोलीस आयुक्त डॉ. के. व्यंकटेशम यांच्या हस्ते सत्कार आणि बक्षीस देण्यात आले. यंदाचे स्पर्धेचे ३७ वे वर्ष होते, या स्पर्धेत पुणे शहर आणि पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयातील १६० पोलीस खेळाडूंचे ४ संघ सहभागी झाले होते. तीन दिवस स्पर्धेत बास्केटबॉल, कबड्डी, खो-खो, कुस्ती, बॉक्सिंग, ज्युडो अशा विविध सांघिक आणि वैयक्तिक क्रीडा स्पर्धा घेण्यात आल्या. जनरल चॅम्पियनशिप ट्रॉफीचा मान मुख्यालय आणि इतर शाखा संघाने पटकाविला. स्पर्धेच्या समारोपावेळी १०० मीटर धावण्याची स्पर्धा घेण्यात आली. यात पुरुष गटातून पोलीस शिपाई महेश आव्हाळे यांनी प्रथम क्रमांक, तर पोलीस शिपाई गोविंद कोळेकर यांनी द्वितीय क्रमांक पटकाविला. महिला गटात महिला पोलीस शिपाई दीपा पवार यांनी प्रथम क्रमांक पटकाविला, तर पल्लवी वराळे यांनी द्वितीय क्रमांक पटकाविला. या वेळी सह पोलीस आयुक्त डॉ. रवींद्र शिसवे, अपर पोलीस आयुक्त डॉ. संजय शिंदे, अशोक मोराळे, सुनील फुलारी, श्रीकांत तरवडे उपस्थित होते.

# अभिप्राय...

प्रति,

मा. वरीष्ठ पोलीस निरीक्षक सो.
सिंहगडरोड पोलीस स्टेशन, पुणे शहर
यांना सविनय सादर,

प्रतिवेदक :- आर.के.गोसावी, पोलीस हवालदार ५३८८, सिंहगडरोड पोलीस स्टेशन, पुणे

विषय :- दर्पन पुस्तकासंदर्भात अभिप्रायबाबत.

उपरोक्त विषयान्वये सविनय सादर की, मा. पोलीस आयुक्त सो. पुणे शहर यांनी पोलीस आयुक्तालयातील अधिकारी व कर्मचारी यांनी केलेल्या चांगल्या कामगिरीची माहिती नागरिकांना समजावी या उद्देशाने पोलीस ठाणे येथे दैनंदिनी कामकाज करीत असताना झालेल्या चांगल्या कामगिरीबाबतची प्रेसनोट जनसंपर्क अधिकारी पोलीस आयुक्त कार्यालय पुणे शहर यांचे कार्यालयात सादर करणेबाबत दिलेल्या आदेशाप्रमाणे पोलीस ठाणे येथे आठवडाभरामध्ये झालेल्या चांगल्या कामगिरीची प्रेसनोट सादर करण्यात येत असुन सदरची प्रेस नोट वर्तमानपत्रामध्ये प्रसिध्द झाल्यानंतर सदरचे पेपर कात्रनाची कटिंग करुन त्या पासुन दर्पन हे पुस्तक तयार करण्यात आले आहे. सदरचे पुस्तक हे ठाणे अमंलदार कक्षामध्ये ठेवण्यात येत असुन पोलीस ठाणे येथे येणारे नागरिकांना सदरचे पुस्तक वाचण्यासाठी देण्यात येत असते.

दर्पन या पुस्तकामुळे पोलीस आयुक्तालयातील अधिकारी व कर्मचारी यांनी केलेल्या चांगल्या कामगिरीची माहिती एकत्रीतपणे वाचण्यासाठी उपलब्ध झालेली असुन दर्पन पुस्तक वाचल्यानंतर नागरिक हे पोलीसांचे चांगल्या कामाचे कौतुक करत आहे. नागरिकांच्या मनामध्ये पोलीसांविषयी चांगल्या प्रकारची भावना निर्माण होत आहे. तसेच पोलीस कर्मचारी व अधिकाऱ्यांचेही मनोबल वाढलेले असुन ते ही चांगली कामगिरी करुन आपले नाव व फोटो वर्तमान पत्रामध्ये येवुन त्याचे कात्रण दर्पण पुस्तकामध्ये समाविष्ट होणेसाठी चांगली कामगिरी करण्याचे प्रयत्न करीत आहेत.

मा. सादर व्हावे,
दि. १८/०६/२०१९

( आर.के.गोसावी )
पोलीस हवालदार ५३८८
सिंहगडरोड पोलीस ठाणे पुणे शहर.

---

प्रति,

मा. पोलीस आयुक्त सो,
पुणे शहर
यांना सविनय सादर

रिपोर्ट : - के एस पलांडे पोलीस शिपाई ८५६४ चंदननगर पोलीस स्टेशन पुणे शहर
यांजकडुन विनंती पुर्वक की,

विषय : - दर्पण पुस्तिकेच्या अभिप्रायाबाबत...

महोदय,

/- उपरोक्त विषयान्वये सविनय सादर की, मी चंदननगर पोलीस स्टेशन या ठिकाणी ०३ वर्षापासुन नियुक्तीस असुन सायबर विभागामध्ये काम करत आहे. मा.पोलीस आयुक्त सो यांनी दर्पण पुस्तीकेच्या माध्यमातुन पोलीसांनी केलेली कामे, गुन्हयाचा लावलेला शोध, जेष्ठ नागरिकांना केलेली मदत व गुन्हास प्रतिबंध होणेसाठी केलेल्या उपाययोजना तसेच सामान्य नागरीकांना येणाऱ्या अडचणी कशा सोडवाव्या या सदंर्भात केलेले मार्गदर्शन केले आहे. तसेच पोलीसांनी केलेल्या कामचे प्रशिस्ती प्रत्रक दपर्ण या पुस्तीकेच्या माध्यमातुन समाजासमोर मांडले आहे. त्यामुळे पोलीस व सामान्या नागरीकामध्ये चांगले सबंध तयार होत आहेत. त्यामुळे दर्पण ही पुस्तीकेचे पोलीस स्टेशनला येणारे नागरीक खुप कौतुक करत आहेत.

दर्पण पुस्तीका पोलीसांनी केलेल्या कामाचा सन्मानाबाबात मा.पोलीस आयुक्त सो. यांचे खुप खुप अभिनंदन. माननियांना सादर

तरी सदर माहिती अवलोकन व आदेशार्थ सविनय सादर.

मा.सादर व्हावे
दि. १६/०५/२०१९

पोलीस शिपाई ८५६४
चंदननगर पोलीस स्टेशन पुणे शहर


चुकलेला मुलगा विसावला आईच्या कुशीत
At junctions of Smart City, an 'intelligent' syste
o help manage Pune's many traffic problems
आयुक्तांकडून कॉन्स्टेबलला मिळाले 'सरप्राईज गिफ्ट'
गुन्हे शाखेने ८० लाखांचे हस्तिदंत पकडले
नदीत पडलेल्या मुलाचे पोलिसांनी वाचविले प्राण
तब्बल २२ वर्षे फरार असलेल्यास केले जे
स्थानबद्धतेतून सराइतांवर पोलिसांच
व्हिडिओ कॉल सुरू ठेवून आत्महत्येचा प्रयत्न
क्तृत्वाने व्यक्तिमत्त्व होते समृद्ध
चोरांची टोळी अटके
८२ मोबाइल जप्त
तत्काळ मदतीला धावून पोलिसांनी वाचवले प्राण
नदीत उडी मारलेल्या तरुणाला वाचवले
द्धिवादाची जोपासना करा
ज्याच्या नावाखाली चालणा
या व्यवसायाचा पर्दाफाश
तंबाखूजन्य पदार्थ
णाणाऱ्यांवर कारवाई
दागिनेचोर जेरबंद
ILLEGAL SAND TRANSPORTATION
Driver arrested for stealing trucks attached by revenue dept officials
डॉक्टरच्या वेशातील वाहनचोरास अटक
गुन्हेगार जेरबं
नावट वस्तू बनवणाऱ्या कंपनीचा पर्दाफाश
वाघाच्या कातड्याची तस्करी
e Branch busts inters
seize 452 choppers
बेकायदा पिस्तूल बाळगणारा अटकेत
महागडी घड्याळे लांबविणारी दिल्लीतील चोरट्यांची टोळी
पिस्तुलाची हौस पडली महागात!
दोघांना अटक, भारती विद्यापीठ पोलिसांची कारवाई
दोन दिवसांत ३७५ कोयते जप्त